ePaper
युद्धाचे चटके बसायला सुरुवात! प्रीमियम पेट्रोलच्या दरात वाढ

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 21 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!






चाकणकर यांनी अमावस्येला केली काळी जादू!

## जनतेनं पर्यायी व्यवस्थेचा पण विचार करावा, LPG तुटवड्यावर सरकारचं स्पष्टीकरण

# संकट अजून संपलं नाही!

**महाईन्यूज I नवी दिल्ली**

**मध्यपूर्वेतील इस्रायल-इराण संघर्षाचा परिणाम आता भारतातही स्पष्टपणे जाणवू लागला आहे. या युद्धाला 20 दिवस पूर्ण झाले असताना हॉर्मुज सामुद्रधुनीतून कच्चे तेल व गॅस घेऊन जाणाऱ्या जहाजांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. परिणामी, देशात एलपीजी गॅसच्या पुरवठ्यावर ताण निर्माण झाला असून परिस्थिती चिंताजनक असल्याचे सरकारने मान्य केले आहे.**



### घरगुती ग्राहकांना 100% पुरवठा; नागरिकांना अफवांपासून सावध राहण्याचे आवाहन

सरकारकडून सध्या घरगुती ग्राहकांना एलपीजीचा अखंड आणि 100 टक्के पुरवठा केला जात आहे. सुरुवातीला वाढलेली पॅनिक बुकिंग आता काही प्रमाणात कमी झाल्याचे चित्र दिसत आहे. नागरिकांनी अफवांना बळी न पडता शांतपणे परिस्थितीचा विचार करावा, असे प्रशासनाचे आवाहन आहे. गरजेपेक्षा जास्त गॅस बुक केल्यास इतर ग्राहकांवर परिणाम होऊ शकतो, याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येकाने जबाबदारीने वागून फक्त आवश्यकतेनुसारच एलपीजी सिलेंडर बुक करावा, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

### काळाबाजारावर कडक कारवाई, ठीक-ठिकाणी छापे

साठेबाजी व काळाबाजार रोखण्यासाठी सरकारने देशभरात कडक पावले उचलली आहेत. यासाठी विविध राज्यांमध्ये विशेष तपास पथकांमार्फत मोठ्या प्रमाणावर छापेमारी सुरू आहे. ४५०० हून अधिक ठिकाणी कारवाई करत अनधिकृत साठे जप्त करण्यात आले आहेत. एलपीजीचा पुरवठा सामान्य नागरिकांपर्यंत पारदर्शकपणे पोहोचावा, यासाठी प्रशासन सतर्क आहे. काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करत भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्याचा सरकारचा निर्धार आहे.

### एलपीजी पुरवठ्यावर तणावाचे सावट

पेट्रोलियम मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी एलपीजीची परिस्थिती गंभीर असल्याचे स्पष्ट केले. वाढत्या जागतिक तणावामुळे पुरवठा साखळीवर परिणाम होत असून सरकार सतत प्रयत्नशील आहे.

पेट्रोलियम मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी स्पष्ट सांगितलं की, एलपीजीची परिस्थिती अजूनही गंभीर आहे आणि पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. मात्र, वाढत्या तणावामुळे पुरवठा साखळीवर परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

सरकारने दिलेल्या माहितीनुसार, घरगुती ग्राहकांना सध्या 100 टक्के एलपीजी पुरवठा केला जात आहे. पॅनिक बुकिंगमध्ये काही प्रमाणात घट झाली असली तरी नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता गरजेनुसारच गॅस बुक करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच सरकारने एक महत्त्वाची सूचना देखील दिली आहे. एलपीजीचा तुटवडा वाढू शकतो, त्यामुळे नागरिकांनी पर्यायी इंधन पर्यायांचा विचार करावा. घाईघाईने गॅस साठवण्यापेक्षा संयम बाळगणे अधिक आवश्यक असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, काळाबाजार आणि साठेबाजीवरही सरकारने कडक कारवाई केली आहे. देशभरात 4500 हून अधिक ठिकाणी छापेमारी करण्यात आली असून, एलपीजीचा पुरवठा योग्य प्रकारे सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावा, यासाठी ही मोहीम राबवली जात आहे.

सरकारने देशांतर्गत उत्पादन वाढवण्यावरही भर दिला आहे. सध्या एलपीजीचे देशांतर्गत उत्पादन सुमारे 40 टक्क्यांपर्यंत पोहोचले असून, आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

दरम्यान, खाडी भागातील परिस्थितीही तणावपूर्ण आहे. राकेश सिन्हा यांनी दिलेल्या माहितीनुसार, खाडी भागात असलेली भारताची 22 जहाजे आणि त्यावरील खलाशी सुरक्षित आहेत. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, पंतप्रधानांनी ओमान, कतार यांसारख्या देशांबरोबर तसेच फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्यासह जागतिक नेत्यांशी संवाद साधत परिस्थिती शांत करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत.

मात्र, या संघर्षामुळे जीवितहानी होत आहे. रियाधमध्ये 18 मार्च रोजी झालेल्या हल्ल्यात एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला असून, आतापर्यंत या संघर्षात 6 भारतीयांचा बळी गेला आहे, अशी माहिती अतिरिक्त सचिव असीम महाजन यांनी दिली.

एकूणच, एलपीजी तुटवड्याची भीती, वाढती जागतिक अस्थिरता आणि जीवितहानी या सगळ्यामुळे परिस्थिती गंभीर बनली आहे. पुढील काही दिवस भारतासाठी आणि जगासाठी अत्यंत महत्त्वाचे असणार आहेत.

# चाकणकर यांनी अमावस्येला केली काळी जादू!

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदावरुन रूपाली चाकणकर यांना हटवा

**महाईन्यूज । पुणे**

**राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदावरुन रूपाली चाकणकर यांना हटविण्यात यावे. बलात्कार प्रकरणातील आरोपी अशोक खरात आणि चाकणकर यांना समोरासमोर बसवून चौकशी करा आणि त्यांची नार्को टेस्ट करावी. तसेच त्यांना अटक झाली पाहिजे,अशी मागणी उध्दवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषदेत केली.**



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांना तंत्र-मंत्र विद्या अवगत होती. त्यांनी स्वतःची अनामिकाही सोमवती अमवस्येला कापली होती, अशी माहिती एका पिडीतीने दिल्याचा आरोप शिवसेना (ठाकरे) नेत्या सुषमा अंधारे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला. चाकणकर फरार होण्यापूर्वी त्यांना अटक करावी, त्यांची नार्को टेस्ट करावी, नाशिक येथील महिला अत्याचार प्रकरणातील आरोपी अशोक खरात आणि चाकणकर यांच्या दूरध्वनी संभाषणाची तपासणी करावी तसेच आर्थिक गुन्हे शाखेने चाकणकर यांच्या आर्थिक स्त्रोतांची चौकशी करावी, अशा काही मागण्याही अंधारे यांनी यावेळी केल्या. जगात एपस्टिन फाईल्स आणि राज्यात कॅप्टन फाईल्स प्रकरण पुढे आले आहे, असेही अंधारे यांनी सांगितले.

नाशिक येथील महिला अत्याचार प्रकरणातील आरोप अशोक खरात यांची पाद्यपूजा करतानाचा चाकणकर यांचा व्हिडिअ उघडकीस आला आहे. या प्रकरणात चाकणकर यांचे सातत्याने नाव येत आहे. या पार्श्वभूमीवर सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी काही पिडीत महिलांचा हवाला देत त्यांनी चाकणकर यांच्यावर आरोप केले.

चाकणकर यांना तंत्र-मंत्र विद्या अवगत होती, अशी माहिती एका पिडीतीने दिली आहे. चाकणकर यांनी २ सप्टेंबर २०२४ मधील सोमवती अमवस्येला स्वतःची अनामिकाही कापली होती. चाकणकर यांच्या अनामिकेला बँडेज असल्याची छायाचित्रेही अंधारे यांनी दाखविली. चाकणकर आणि अशोक खरात यांचे घरगुती संबंध आहेत. खरात यांच्या मुलाच्या लग्नातही चाकणकर उपस्थित होत्या. चाकणकर यांच्या घरात खरात यांची भाची वास्तव्यास आहे, असा आरोप अंधारे यांनी केला.

अंधारे म्हणाल्या, महिला आयोगाच्या अध्यक्ष असतानाही चाकणककर यांनी महिलांना न्याय देण्याएवजी खरात यांना वाचविण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणात नाव आल्यानंतर त्या का बोलत नाहीत, हा प्रश्न आहे. त्या फरार होण्यापूर्वी त्यांना अटक झाली पाहिजे. राज्य महिला आयोग पदाचा दुरूपयोग करून त्यांनू अनेकांवर दबाव टाकला होता. त्यामुळे त्यांना फरार होण्यापूर्वी अटक झाली पाहिजे. अशोक खरात आणि चाकणकर यांचे दूरध्वनीवर किती वेळा संभाषण झाले, यासाठी सीडीआर तपासले पाहिजेत. खरात यांना वाचविण्यासाठी चाकणकर यांनी कोणा कोणाला दूरध्वनी केले होते, याचीही चैकशी झाली पाहिजे. तसेच चाकणकर यांच्या आर्थिक स्त्रोतांचीही आर्थिक गुन्हे शाखेकडून तपासणी व्हावी. त्यांची नार्को टेस्ट करावी, अशी मागणी अंधारे यांनी केली. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यावरील आरोपांमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

### सुनेत्रा पवारांनी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज

अजित पवार यांच्या विमान अपघातापूर्वी त्यांचा बारामती आणि मुंबई येथील घराबाहेर जादूटोण्याशी संबंधित वस्तू सापडल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात पाहायला मिळत आहे. या भाष्य करताना सुषमा अंधारे म्हणाल्या, मुळात असं तंत्र-मंत्र केल्याने काही बिघडू शकतं किंवा घडू शकतं, यावर माझा स्वतःचा अजिबात विश्वास नाही. मात्र, ज्या पद्धतीने हे सर्व समोर येत आहे, ते पाहता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी यामध्ये गांभीर्याने लक्ष घालण्याची गरज आहे.



## अवकाळी पावसाचा तडाखा; कांदा-गहू पिकांचे मोठे नुकसान

**महाईन्यूज । पुणे**

रांजणगाव सांडस तसेच आलेगाव पागा, राक्षेवाडी व परिसरातील गावांमध्ये अवकाळी पाऊस, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची मोठी धावपळ उडाली. कांदा काढून शेतात वाळवण्यासाठी ठेवलेला असताना पावसाची सर आल्याने कांदा उत्पादक शेतकरी प्लास्टिकच्या आच्छादनासाठी धावपळ करत होते. मात्र, अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात कांदा भिजला. आधीच कांद्याचे बाजारभाव घसरले असताना पावसामुळे दुहेरी संकट ओढवल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

सध्या परिसरात गहू काढणीचे काम सुरू असताना जोरदार वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी गव्हाची पिके जमीनदोस्त झाली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. अवकाळी पावसाचा फटका वीटभट्टी व्यवसायालाही बसला आहे. पावसामुळे कच्च्या विटा भिजल्याने वीटभट्टी चालकांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाने तातडीने पंचनामे करून मदत जाहीर करावी, अशी मागणी केली आहे.

## रमजान ईदनिमित्त गोळीबार मैदान चौकात वाहतूक बदल

**महाईन्यूज । पुणे**

**रमजान ईदनिमित्त शनिवारी (२१ मार्च) लष्कर भागातील ईदगाह मैदान येथे सामुहिक नमाज पठण करण्यात येणार आहे. सकाळी सहा ते साडेअकरा वाजेपर्यंत लष्कर भागातील गोळीबार मैदान चौकातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार असून, वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे.**



'गोळीबार मैदान चौकातील ईदगाह मैदान येथे रमजान ईदनिमित्त नमाज पठणासाठी मुस्लीम बांधवांची मोठी गर्दी होते. यापार्श्वभूमीवर शनिवारी सकाळी सहा ते साडेअकरा वाजेपर्यंत या भागातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत. वाहन चालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा', असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी केले आहे.

गोळीबार मैदान चौकातून स्वारगेटकडे जाणारी जड वाहने ही पुणे-सोलापूर रस्त्यावरील भैरोबा नाला चौकातून वानवडी, लुल्लानगर चौकातून इच्छितस्थळी जातील. गोळीबार मैदान चौकातून स्वारगेट किंवा शहरात येणाऱ्या वाहनांनी भैरोबा नाला चौकातून एम्प्रेस गार्डन, घोरपडीमार्गे इच्छितस्थळी जावे. लष्कर भागातील मम्मादेवी चौक ते गोळीबार चौक दरम्यानची वाहतूक पूर्णपणे बंद राहणार आहे. सीडीओ चौकातून गोळीबार मैदानकडे जाणारी वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. गोळीबार मैदान चौकाकडे जाणाऱ्या वाहनांनी खटाव बंगला चौकातून नेपियर रस्तामार्गे बिशप स्कूल या रस्त्याचा वापर करावा. खटाव बंगला चौकातून उजवीकडे वळण्यास तात्पुरत्या स्वरुपात परवानगी देण्यात आली आहे.

स्वारगेटकडून सोलापूर रस्त्याने हडपसरकडे जाणाऱ्या वाहनांनी शंकरशेठ रस्त्यावरील चिमणराव ढोले पाटील चौकातून (सेव्हन लव्हज चौक) गुलटेकडी मार्ग सॅलिसबरी पार्क चौकाकडे जावे. खटाव बंगला चौकातून नेपियर रस्त्याने सोलापूर रस्त्याकडे जावे. खटाव बंगला चौकातून लुल्लानगरमार्गे वाहने सोलापूर रस्त्याकडे जातील. सोलापूर बाजार पोलीस चौकी ते गोळीबार मैदान चौक दरम्यानची वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. लुल्लानगर चौकातून गोळीबार मैदान चौकाकडे येणाऱ्या जड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेवर नवा आर्थिक बोजा

## मेट्रो प्रकल्पामुळे शासनाला देय रक्कम थकीत; नव्या कारभाऱ्यांसमोर आर्थिक आव्हान

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात मेट्रो प्रकल्प सुरू झाल्यानंतर बांधकाम परवानगीतून सन 2018 पासून अतिरिक्त अधिमूल्य वसुली करण्यात येत आहे. तसेच, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) प्रीमियममधून मिळणार्या उत्पन्नाचा 50 टक्के हिस्सा राज्य शासन आणि संबधित विभागांना अदा करणे अपेक्षित आहे. तो हिस्सा थकीत असून, आगामी वर्षात तब्बल 1 हजार 418 कोटी रुपये शासनाला द्यावे लागणार आहेत. परिणामी, आधीच कर्ज, देणीमुळे (दायित्व) आणि लवादामुळे अडचणीत असलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेवर आर्थिक विळखा वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे.**



महामेट्रोकडून पहिल्या टप्प्यात पिंपरी ते स्वारगेट मार्ग तयार करण्यात आला. दुसऱ्या टप्प्यात पिंपरी ते निगडी आणि पीएमआरडीएमार्फत हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू आहे. या प्रकल्पामध्ये पिंपरी-चिंचवड महापालिकेचाही सहभाग आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद केली. या नागरी परिवहन प्रकल्पांसाठी शहरात बांधकाम परवानगी देताना 100 टक्के वाढीव विकास शुल्क आकारणी महापालिकेने सुरू केली. त्यातून जमा झालेल्या उत्पन्नातून 50 टक्के हिस्सा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महामेट्रो व पीएमआरडीए देणे अपेक्षित आहे.

त्यानुसार नागरी परिवहन प्रकल्प घोषित केल्यानंतर 10 मे 2018 पासून पुढे जमा झालेल्या विकास शुल्क निधीपैकी 50 टक्के रक्कम नागरी परिवहन निधीमध्ये वर्ग करणे आवश्यक आहे. त्यासाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात जमा व खर्चामध्ये लेखाशीर्ष तयार करणे व तरतूद करण्यास तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली. मात्र, तो निधी शासनाने मागणी करूनही महापालिकेने दिला नाही. मागील सात वर्षांत 1 हजार 379 कोटी वसूल झाले असून, त्यापैकी 688 कोटी रुपये शासनाने देणे प्रलंबित आहे.

महापालिकेचा आगामी सन 2026-27 या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प 28 फेब्रुवारीला तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी स्थायी समितीला सादर केला, परंतु त्यानंतर दहा दिवसांनी म्हणजेच 10 मार्च 2026 रोजी बांधकाम परवानगी विभागाने पत्राद्वारे लेखा विभागाला तब्बल 1 हजार 418 कोटी रुपयांचा हिस्सा देणे प्रलंबित असून, त्यासाठी तरतूद करण्यास कळविले. त्यामुळे अर्थसंकल्प तयार करताना संबंधित विभागाचे अधिकारी गप्प का होते, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

> अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्याबाबत कळवले आहे. राज्य शासनाकडील शासन आदेशानुसार समर्पित नागरी परिवहन निधी व नागरी परिवहन निधीअंतर्गत बांधकाम परवानगीतून मिळालेल्या महसुलाचा निश्चित करून दिलेला हिस्सा शासन तसेच, संबंधित प्राधिकरणाकडे वर्ग केला जातो. तसेच, अतिरिक्त एफएसआय दिल्यामुळे मिळणाऱ्या उत्पन्नाचाही काही हिस्सा शासनाला द्यावा लागतो. त्याप्रमाणे महापालिका अर्थसंकल्पात त्या प्रमाणात निधीची तरतूद करण्यास कळविण्यात आले आहे.
>
> - सुनील भागवानी, सहशहर अभियंता, बांधकाम विभाग, महापालिका

### नव्या कारभाऱ्यांसमोर आर्थिक संकट

यूडीसीपीआर नियमानुसार प्रीमियम भरून अतिरिक्त 35 % एफएसआय बांधकाम परवानगी देताना दिला जातो. त्यापैकी 50 % हिस्सा हा शासनाला द्यावा लागतो. त्यातून सन 2020-21 ते मार्च 2026 अखेर एकूण 1 हजार कोटी रुपये बांधकाम परवानगी विभागाला मिळाले. त्यापैकी सहा वर्षांत जमा झालेल्या उत्पन्नातून 730 कोटी रुपयांचा हिस्सा शासनाला द्यावा लागणार आहे. या दोन्ही बाबी मिळून महापालिकेला तब्बल 1 हजार कोटी रुपये राज्य शासनाला द्यावे लागणार आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यासाठी महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभागाने मुख्य लेखा व वित्त विभागाला कळविले आहे. प्रशासकीय काळातील उधळपट्टी, कर्ज, आणि दायित्वाचा वाढलेला डोंगर तसेच, लवाद प्रकरणातील मोठी देणी यामुळे महापालिकेची आर्थिक स्थिती बिकट आहे.

---

# नारायणगावच्या तमाशा पंढरीत कोट्यवधींची उलाढाल

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पाडव्याच्या शुभमुहूर्तावर नारायणगाव (ता. जुन्नर) येथील ऐतिहासिक तमाशा पंढरीत यंदा मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल झाली. अवघ्या 15 दिवसांच्या कालावधीत सुमारे 9 ते 10 कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचा अंदाज फडमालकांनी व्यक्त केला. त्यामुळे यंदाचा तमाशा हंगाम अत्यंत उत्साहवर्धक ठरत आहे.**



पाडव्याच्या शुभमुहूर्तावर नारायणगाव (ता. जुन्नर) येथील ऐतिहासिक तमाशा पंढरीत यंदा मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल झाली. अवघ्या 15 दिवसांच्या कालावधीत सुमारे 9 ते 10 कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचा अंदाज फडमालकांनी व्यक्त केला. त्यामुळे यंदाचा तमाशा हंगाम अत्यंत उत्साहवर्धक ठरत असून, कलाकार आणि फडमालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

दरम्यान, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे बारामती परिसरात काही प्रमाणात तमाशा बारीवर परिणाम झाल्याचे काही फडमालकांनी नमूद केले. तरीही इतर भागांमध्ये प्रेक्षकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात असल्याने एकूण हंगामावर त्याचा विशेष परिणाम झाला नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे बारामती परिसरात काही प्रमाणात तमाशा बारीवर परिणाम झाल्याचे फडमालकांनी सांगितले. मात्र, इतर भागांत प्रेक्षकांचा ओघ कायम असल्याने एकूण हंगामावर त्याचा फारसा परिणाम झालेला नाही. फडमालकांनी सांगितले की, सध्या प्रेक्षकांची आवड झपाट्याने बदलत आहे. पारंपरिक वग (नाट्यप्रधान भाग) किंवा दीर्घ कथानकांपेक्षा उडत्या चालीची, जलदगतीची गाणी आणि नृत्यप्रकारांना अधिक मागणी आहे. त्यामुळे कार्यक्रमाची रचना देखील त्यानुसार बदलावी लागत आहे. पूर्वी वगाला खूप महत्त्व असायचे; मात्र, आता त्याला फारशी मागणी उरलेली नाही. प्रेक्षकांना जलद आणि मनोरंजक सादरीकरण हवे असते, असे काही फडमालकांनी स्पष्ट केले. यंदाचा तमाशा हंगाम अत्यंत चांगला चालला आहे. प्रेक्षकांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात मिळत असून, आर्थिकदृष्ट्याही समाधानकारक परिस्थिती आहे असे फडमालक मोहित नारायणगावकर यांनी सांगितले.

---

# शिवतेज नगर येथे श्री स्वामी समर्थ प्रकट दिन उत्साहात साजरा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

शिवतेज नगर येथील श्री स्वामी समर्थ सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकट दिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. यावेळी आठवडाभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्रीपाद वल्लभ पारायण कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्रकट दिनाच्या दिवशी सकाळी अभिषेक, होम-हवन, महाआरती तसेच भजन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्वामींना ५६ भोगांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. दिवसभर भक्तिमय वातावरणात कार्यक्रम पार पडले. सायंकाळी “स्वरमोहीनी” या भक्ती व भावगीतांच्या कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. शेवटी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.





## भूमिका

**अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष अपेक्षेपेक्षा अधिक लांबल्यामुळे जागतिक तेलबाजारात प्रचंड अस्थिरता निर्माण झाली असून, त्याचा थेट परिणाम भारत आणि इतर अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे. इराणवर होणाऱ्या हल्ल्यांचा बदला म्हणून त्याने आसपासच्या देशांवर आणि समुद्री मार्गांवर केलेल्या कारवायांमुळे या युद्धाला एक वेगळेच वळण मिळाले आहे.**

# जागतिक तेलसंकट आणि पर्यायी धोरण




विशेषतः होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी तेल आणि इंधन वायूची वाहतूक मंदावल्याने जागतिक पुरवठा साखळीवर ताण आला आहे. जगात कच्च्या तेलाची प्रत्यक्ष कमतरता नसली, तरी वाहतुकीच्या मार्गांवरील अनिश्चितता आणि भौगोलिक जोखीम यामुळे बाजारात घबराट पसरली आहे.

गेल्या पंधरा दिवसांत जागतिक स्तरावर तेलाच्या किमतींमध्ये ४० ते ६० टक्क्यांनी वाढ झाली आहे. यामुळे तेल आयात करणाऱ्या देशांचा, विशेषतः भारताचा आयात खर्च प्रचंड वाढला असून, चलनवाढीचा आणि आर्थिक दबावाचा धोका निर्माण झाला आहे. भारतात अद्याप पेट्रोल-डिझेलचे दर वाढलेले नाहीत, याचे प्रमुख कारण म्हणजे देशातील तेलसाठा करण्याच्या क्षमतेत झालेली वाढ. मात्र, ही साठवण क्षमता मर्यादित असून, युद्ध आणखी लांबल्यास परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते, हे वास्तव नाकारता येणार नाही.

भारत आणि पूर्व आशियातील अनेक देश आजही आपल्या तेलपुरवठ्यासाठी होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अवलंबून आहेत. हा भौगोलिक अवलंबित्व धोक्याची घंटा आहे. युद्धामुळे या जलमार्गावरील वाहतूक धोक्यात आली असून, पर्यायी मार्ग शोधणे ही काळाची गरज बनली आहे. सध्या भारत रशिया आणि व्हेनेझुएला यांसारख्या देशांकडून मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी करत आहे. अमेरिकेने रशियाच्या तेलावरील निर्बंध शिथिल केल्यामुळे काहीसा दिलासा मिळाला असला, तरी रशियाच्या तेलाची जागतिक मागणी वाढल्यामुळे ते आता पूर्वीइतके स्वस्त मिळणार नाही. त्यामुळे 'आदर्श' परिस्थिती संपली असून, आता व्यवहारवादी धोरणांची गरज आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या आखाती प्रदेशात अनेक युद्धे झाली आहेत, पण तेल आणि इंधन वायूच्या संदर्भात अशा प्रकारची 'कोंडी' होण्याची ही कदाचित पहिलीच वेळ असावी. १९९० च्या दशकातील अमेरिका-इराक युद्धादरम्यानही तेलाचे दर दुप्पट झाले होते, पण ते युद्ध लवकर संपल्याने परिस्थिती स्थिरावली. मात्र, सध्याचे संघर्ष अधिक गुंतागुंतीचे आणि विस्तारलेले दिसत असून, त्याचे परिणाम दीर्घकाळ टिकण्याची शक्यता आहे. अशा वेळी 'दोष कोणाचा' या चर्चेपेक्षा 'परिणाम कसे कमी करायचे' यावर लक्ष केंद्रित करणे अधिक महत्त्वाचे ठरते.

राजकीय पातळीवर, भारतात विरोधी पक्षांनी सुरुवातीला केंद्र सरकारच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली होती. मात्र, काँग्रेसचे नेते मनीष तिवारी आणि शशी थरुर यांनी नुकतेच सध्याच्या परिस्थितीत सरकारने बाळगलेले मौन आणि सावध धोरण योग्य असल्याचे मत व्यक्त केले आहे. ही वैयक्तिक भूमिका आहे की पक्षीय, हे स्पष्ट नसले तरी, अशा संकटकाळात राजकीय एकता आणि जबाबदार विचारसरणीची गरज असते. भारताने कोणत्याही एका बाजूने झुकणे टाळून, आपल्या राष्ट्रीय हिताला प्राधान्य देणेच योग्य ठरेल.

भारतासमोरचा सर्वात महत्त्वाचा पर्याय म्हणजे ऊर्जा सुरक्षेसाठी दीर्घकालीन धोरण राबवणे. होर्मुझवरचा अवलंब कमी करण्यासाठी पर्यायी वाहतूक मार्ग, नवीन तेल पुरवठादार देश आणि अक्षय ऊर्जेकडे वाढ हे तीन स्तंभ या धोरणाचे असावेत. रशिया, व्हेनेझुएला, मध्य आशिया आणि आफ्रिकेतील देशांकडून तेल आयातीचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच, भारतातील तेलसाठा करण्याची क्षमता आणखी वाढवणे, आणि गॅस पाईपलाईन आणि लिक्विफाइड नॅचरल गॅस (LNG) सारख्या पर्यायांवर भर देणे गरजेचे आहे. हे पर्यायी मार्ग पारंपरिक मार्गांपेक्षा खर्चिक असले, तरी ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने ते अपरिहार्य आहेत. शेवटी, हे युद्ध थांबले तरी जागतिक बाजारपेठ आणि पुरवठा साखळी पूर्ववत होण्यास काही काळ लागेल.

## प्रासंगिक »

### यशाची गुरुकिल्ली

***एका गावात दोन मित्र राहत होते - राम आणि श्याम. दोघेही एकाच शाळेत शिकत होते. राम खूप हुशार होता, पण तो आळशी होता. तो अभ्यास टाळत असे आणि नेहमी उद्या करेन असे म्हणे.***

दुसरीकडे, श्याम साधा होता, पण तो खूप मेहनती होता. तो रोज नियमित अभ्यास करत असे. शाळेची वार्षिक परीक्षा आली. रामने विचार केले, "मी एक रात्रीत सर्व काही शिकून घेईन." पण परीक्षेच्या आदल्या दिवशी त्याला समजले की, एका रात्रीत सर्व काही शक्य नाही. दुसरीकडे, श्यामने महिनाभर नियमित तयारी केली होती. परीक्षेचा निकाल लागला. श्याम प्रथम क्रमांकाने पास झाला, तर राम नापास झाला. रामला खूप वाईट वाटले. तेव्हा शिक्षक म्हणाले, "यशाची गुरुकिल्ली म्हणजे सततची मेहनत आणि नियमितता. फक्त बुद्धिमत्ता पुरेशी नाही." त्या दिवशी रामला समजले की, यशस्वी होण्यासाठी कष्ट आणि शिस्त आवश्यक आहे. त्याने ठरवले की, तो पुढे कधीही आळस करणार नाही.

तात्पर्य- यश हे नशिबात नसून कष्टात असते. नियमित प्रयत्न आणि चिकाटी यामुळेच यश मिळते.

कर्नाटकातील सध्याच्या राजकीय परिस्थितीचे विश्लेषण करताना दावणगेरे दक्षिण आणि बागलकोट विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुका आणि विधानसभेत घडलेला सभाध्यक्षांच्या सभात्यागाचा प्रकार या दोन प्रमुख घडामोडींकडे लक्ष वेधावे लागते.

# राजकीय घडामोडी आणि प्रशासकीय आव्हाने



कर्नाटकातील सध्याच्या राजकीय परिस्थितीचे विश्लेषण करताना दावणगेरे दक्षिण आणि बागलकोट विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुका आणि विधानसभेत घडलेला सभाध्यक्षांच्या सभात्यागाचा प्रकार या दोन प्रमुख घडामोडींकडे लक्ष वेधावे लागते. दावणगेरे दक्षिण व बागलकोटचा निकाल हा पाच राज्यांतील निवडणूक निकालांबरोबरच जाहीर होणार असल्याने, तोपर्यंत मुख्यमंत्री सिद्धरामय्या व उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यात मुख्यमंत्रिपदावरून सुरू झालेल्या संघर्षाला काहीसा तात्पुरता विराम मिळण्याची शक्यता आहे. मात्र, या सत्तासंघर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनात अधिकारशाही माजली असून, सरकारवरील नेत्यांची पकड ढिली झाल्याचे संकेत विधानसभेत घडलेल्या एका घटनेने मिळाले आहेत.

विधानसभेत सोमवारी, १६ मार्च रोजी सभाध्यक्ष यु. टी. खादर यांनी स्वतःहून सभात्याग केला. ही घटना अत्यंत गांभीर्याने पाहण्यासारखी आहे, कारण यामुळे सरकारच्या प्रतिष्ठेलाच धक्का बसला आहे. विधिमंडळाचे कामकाज हे कठोर नियमांनुसार चालते. प्रश्नोत्तर तास, शून्य तास, लक्षवेधी आणि स्थगन प्रस्ताव यांवर चर्चा कशी करावी, याचे नियम निश्चित आहेत. कामकाजाच्या सुरुवातीला प्रश्नोत्तरांचा तास असतो, परंतु सर्व आमदारांचे प्रश्न तारांकित होत नाहीत. वेळेअभावी सुमारे १५ तारांकित प्रश्न निवडले जातात आणि उर्वरित प्रश्न व त्यांची उत्तरे नंतर पटलावर मांडली जातात. नियमानुसार, एखाद्या अधिवेशनात विचारलेल्या प्रश्नाला त्याच अधिवेशनात किंवा किमान पुढच्या अधिवेशनापर्यंत उत्तर मिळणे अपेक्षित असते. दुर्दैवाने, तीन अधिवेशने उलटूनही अनेक आमदारांच्या प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत. याच कारणास्तव सभाध्यक्ष यु. टी. खादर नाराज झाले आणि आमदारांच्या प्रश्नांना उत्तरे मिळत नसतील तर कामकाज कसे चालवायचे, असा प्रश्न उपस्थित करून त्यांनी सभात्याग केला.

मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी हा प्रकार गांभीर्याने घेतला असून, त्यांनी त्वरित सभाध्यक्षांशी चर्चा करून त्यांची समजूत काढली आहे आणि भविष्यात असे होणार नाही, अशी ग्वाही दिली आहे. सोमवारी २३० लेखी प्रश्नांपैकी केवळ ८४ प्रश्नांचीच उत्तरे पटलावर मांडल्याने सभाध्यक्ष संतापले होते. या प्रकरणी मुख्य सचिव शालिनी रजनीश यांनी आठ आयएएस अधिकाऱ्यांना नोटिसा पाठवल्या आहेत. मात्र, दुसऱ्या दिवशी मंगळवारीही कोरमअभावी कामकाजाला एक तास उशीर झाला, हे लक्षात घेता प्रशासनातील ही समस्या किती गंभीर आहे, हे दिसून येते.

राजकीय बाजूने पाहिले तर, दावणगेरे दक्षिण आणि बागलकोट मतदारसंघ हे पूर्वी काँग्रेसच्या ताब्यात होते. एच. वाय. मेटी यांच्या निधनामुळे बागलकोटचा मतदारसंघ रिक्त झाला आहे. ९ एप्रिल रोजी या दोन्ही मतदारसंघांसाठी मतदान होणार असून, ही निवडणूक राजकीय पक्षांसाठी, विशेषतः काँग्रेस आणि भाजपसाठी एक कसोटी ठरणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



**समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ।**
**तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥**
**आणीक न लगे मायिक पदार्थ ।**
**तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ध्रु.॥**

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सुनेत्रा काकी, जय आणि पार्थने काळजी घ्यावी!

## आमदार रोहित पवारांची पोस्ट चर्चेत; अशोक खरात प्रकरण नेमकं काय?

महाईन्यूज । मुंबई

**भोंदूगिरी करून महिलांचं लैंगिक शोषण करणाऱ्या अशोक खरात या स्वयंघोषित बाबाला पोलिसांनी अटक केली असून त्याला २४ दिवसांची कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर अडचणीत आलेल्या असताना दुसरीकडे अजित पवार विमान अपघात प्रकरणीही या भोंदूबाबाचं नाव आता जोडलं जात आहे. आमदार रोहित पवार यांनीही याबाबत एक्स पोस्ट केली आहे.**





"पुरोगामी विचारांच्या महाराष्ट्रात भोंदुगिरीला स्थानही नाही आणि त्यावर कोणाचा विश्वासही नाही, परंतु आमदार अमोल मिटकरी म्हणत असल्याप्रमाणे अजितदादांच्या सहयोग सोसायटी येथील निवासस्थानाच्या बाहेर केलेला जादूटोणा तसेच देवगिरी बंगल्याबाहेर नाशिकच्या भोंदूबाबाबाच्या माध्यमातून जादूटोणा झाल्याची समोर येत असलेली माहिती बघता हे प्रकरण खूपच भयंकर दिसते", असं रोहित पवार म्हणाले.

ते पुढे म्हणाले, "नाशिकच्या भोंदूबाबाने हा जादूटोणा केला तर मग या भोंदुबाबाबाला भोंदुगिरीची सुपारी देणारे राजकीय राक्षस कोण? त्यांचा या राक्षसी महत्त्वाकांक्षेचा राजकीय हेतू काय होता? या काळात अजितदादांच्या बंगल्यावर भोंदू खरात याच्याशी जवळीक असणारे कोण कोण आले? २७ जानेवारी रोजी संबंधित लोक देवगिरिवर आले होते का? याचा तपास होणे गरजेचे आहे. सुनेत्राकाकी, पार्थ आणि जय यांनी काळजी घ्यावी, कारण आजचं बेभरवशी राजकारण चांगलं राहिलेलं नाही", असंही रोहित पवार म्हणाले.

### अशोक खरात प्रकरण नेमकं काय?

सरकारवाडा पोलीस ठाण्यात महिलेने अशोक खरातविरुध्द दिलेल्या तक्रारीनुसार, स्वतः कडे दैवी शक्ती असल्याचा दावा करून मंत्र तंत्र आणि धार्मिक विधीच्या नावाखाली खरातने विश्वास संपादन केला. यानंतर त्याने कार्यालयात बोलावून गुंगीकारक पदार्थ खाण्यास दिल्यानंतर अत्याचार केला. २०२२ पासून डिसेंबर २०२५ पर्यंत हा प्रकार सुरू होता, असे तक्रारीत नमूद आहे. या तक्रारीनंतर नाशिक गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी पहाटे खरात यास ताब्यात घेतले. त्याच्या कार्यालयातील तपासात ५८ आक्षेपार्ह चित्रफिती सापडल्या. त्याला नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात उपस्थित केले असता २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

### अमोल मिटकरींची पोस्ट काय?



अशोक खरातचे व्हिसीआरच्या मालकाबरोबरच हितसंबंध उघड झाल्याचे सांगून अमोल मिटकरींनी या भोंदू बाबाचे आणि आश्रमातील पुजाऱ्यांचे सीडीआर तपासण्याची मागणी केली आहे. जेणेकरून अजित पवारांचा घात कसा झाला याची माहिती मिळेल असं अमोल मिटकरी म्हणाले. त्यांची हीच पोस्ट रिट्विट करत रोहित पवारांनी प्रश्न उपस्थित केले आहेत.

# खंडित वीजपुरवठ्याच्या प्रश्नावर खासदार लंके यांचे ठिय्या आंदोलन

महाईन्यूज । अहिल्यानगर

**महावितरणने जिल्ह्यात सायंकाळी ६ ते १० दरम्यान सुरू केलेल्या वीज कपातीच्या विरोधात खासदार नीलेश लंके यांनी आज, शुक्रवारी शहरातील महावितरण कार्यालयात ठिय्या आंदोलन करत प्रशासनाला धारेवर धरले. दोन दिवसात वीज कपात बंद झाल्यास कार्यालय बंद पाडण्याचा इशाराही त्यांनी दिला.**



आंदोलनात जिल्हा परिषदेचे माजी सदस्य बाळासाहेब हराळ, प्रा. सिताराम काकडे, रामेश्वर निमसे, श्रीकांत जगदाळे, अमोल खाडे, एकनाथ गांगर्डे, भाऊसाहेब काळे, पोपट पुंड, उद्योजक अल्ताफ शेख तसेच शेतकरी सहभागी होते.

यावेळी बोलताना खासदार लंके म्हणाले, वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. सध्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू आहेत, त्यांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे. महिलांच्या स्वयंपाकाच्या वेळेत वीज नसल्याने अडचणी वाढल्या आहेत. ग्रामीण भागात बिबट्याच्या भीतीमुळे अंधारात राहणे धोकादायक ठरत आहे. या प्रश्नावर अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा झाली. दोन दिवसांत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. आरडीसी योजना पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर २४ तास वीजपुरवठा शक्य होणार आहे.

दरम्यान, अधीक्षक अभियंता सुंदर लटपटे यांनी सांगितले की, वीजचोरी हा गंभीर प्रश्न असून तो नियंत्रणात आल्यानंतर २४ तास वीजपुरवठा देणे शक्य होईल. शक्य तितक्या प्रमाणात वीस पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील. यावेळी अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार उपस्थित होते.

### दिल्लीगेट व माळीवाडा वेस पाडण्यास विरोध

अहिल्यानगर शहराला दिल्लीगेट व माळीवाडा वेशीची पारंपारिक ओळख आहे. जाणीवपूर्वक राजकारण करून माळीवाडा वेस पाडण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप खासदार लंके यांनी माध्यमांशी बोलताना केला. काही समाजकंटक यामागे असल्याचे सांगत त्यांनी वेस पाडण्यास विरोध दर्शवला. शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांवरच आपण राजकारण करत असून म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुतळे उभारले जावेत, अशी मागणी त्यांनी केली.

# युद्धाचे चटके बसायला सुरुवात!

## प्रीमियम पेट्रोलच्या दरात वाढ, सर्वसामान्य पेट्रोलचे दर स्थिर

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**जागतिक बाजारातील घडामोडींचा परिणाम आता भारतातील इंधन दरांवर दिसू लागला आहे. तेल कंपन्यांनी आज प्रीमियम पेट्रोलच्या किमतीत वाढ करण्याची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे, नियमित वापरल्या जाणाऱ्या साध्या पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही, ज्यामुळे सर्वसामान्य वाहनधारकांना तूर्तास दिलासा मिळाला आहे. आखाती देशांमध्ये युद्धाचा भडका उडाल्याने जागतिक ऊर्जा पुरवठा विस्कळीत झाला आहे. परिणामी २० मार्चपासून भारतात प्रीमियम पेट्रोलच्या दरात २.३५ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे.**



बीपीसीएलच्या (BPCL) 'स्पीड', एचपीसीएलच्या (HPCL) 'पॉवर' आणि आयओसीएलच्या (IOCL) 'XP95' पेट्रोलच्या दरात प्रति लिटर २.०९ रुपये ते २.३५ रुपयांची वाढ झाली आहे. तर, सध्या साध्या पेट्रोलच्या दरात कोणताही बदल झालेला नाही.

२८ फेब्रुवारी रोजी इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर आखाती देशांमध्ये तणाव वाढला आहे. यामुळे जगातील २०% तेल आणि वायू वाहतूक करणारा 'होर्मुझची समुद्रधुनी' जवळपास बंद झाली असून पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. एचपीसीएल (HPCL) प्रशासनाने पेट्रोल पंप मालकांना 'पॉवर ९५' च्या दरात २ रुपयां वाढ झाल्याचे कळवले असून नवीन दर लागू करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

दरवाढीनंतर राजधानी दिल्लीमध्ये प्रीमियम पेट्रोलचा दर 107 रुपयांवरून 112.30 रुपये प्रति लिटर झाला आहे. मुंबईत हा दर 115 रुपयांवरून 120.30 रुपये प्रति लिटरपर्यंत गेला आहे, तर चेन्नईमध्ये 112 रुपयांवरून 117.30 रुपये प्रति लिटर असा झाला आहे.

दुसरीकडे, सामान्य पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. मुंबईत पेट्रोल 103.50 रुपये प्रति लिटर आणि डिझेल 90.03 रुपये आहे. तर दिल्लीमध्ये पेट्रोलचा दर 94.77 रुपये प्रति लिटर असून डिझेलचा दर 87.67 रुपये आहे.

प्रीमियम पेट्रोल म्हणजे जास्त ऑक्टेन असलेले इंधन. याचा ऑक्टेन नंबर साधारणपणे 95 किंवा त्याहून अधिक असतो, तर सामान्य पेट्रोलचा ऑक्टेन नंबर 91 असतो. त्यामुळे प्रीमियम पेट्रोल वापरल्यास वाहनाचे इंजिन अधिक स्मूथ चालते आणि कार्यक्षमता वाढते. हे पेट्रोल मुख्यतः मोठ्या शहरांतील पंपांवर उपलब्ध असते आणि स्पोर्ट्स बाईक, टर्बो इंजिन असलेल्या गाड्या तसेच उच्च कार्यक्षमतेच्या कारमध्ये वापरले जाते.

### नियमित इंधन दरात कोणताही बदल नाही

दिल्ली, मुंबई, बंगळूर, हैदराबाद आणि चेन्नई यांसारख्या शहरांमध्ये आज नियमित इंधनाच्या पेट्रोल दरात कोणताही बदल झालेला नाही आणि ते स्थिर आहेत. जागतिक कच्च्या तेलाच्या किमतींमधील अस्थिरता असूनही, धोरणात्मक बाबी आणि महागाईच्या चिंतेमुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमती दीर्घ काळापासून मोठ्या प्रमाणात स्थिर आहेत. एकूण इंधन वापरामध्ये प्रीमियम पेट्रोलचा वाटा कमी असल्याने, तेल कंपन्यांना सर्वसामान्य जनतेवर परिणाम न करता किमती समायोजित करण्यास काही वाव मिळतो.

# इस्रायलच्या हल्ल्यात IRGC चे प्रवक्ते अली मोहम्मद नैनी ठार!

**महाईन्यूज । इराण**

**अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील युद्ध अद्यापही थांबलेलं नाही. अमेरिका-इस्रायल हे संयुक्तपणे इराणवर दररोज भीषण हल्ले करत आहेत, तर इराणीही प्रतिहल्ले करत प्रत्युत्तर देत आहे. या हल्ल्यात काही दिवसांपूर्वी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्यासह शेकडो नागरिकांचा मृत्यू झाला. त्यानंतर काहीच दिवसांत इस्रायलच्या हल्ल्यांमध्ये इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सचिव अली लारीजानी यांचाही मृत्यू झाला. त्यानंतर आता इराणला आणखी एक मोठा धक्का बसला आहे.**



इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सचे (IRGC) प्रवक्ते अली मोहम्मद नैनी हे देखील इस्रायलच्या हल्ल्यात ठार झाल्याची माहिती समोर आली आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्समधील अली मोहम्मद नैनी हे एक महत्वाचे व्यक्ती मानले जात होते. मात्र, अमेरिका आणि इस्रायलच्या हल्ल्यात अली मोहम्मद नैनी हे ठार झाल्याचं वृत्त एएफपी वृत्तसंस्थेने दिलं आहे.

दरम्यान, अली मोहम्मद नैनी यांनी त्यांच्या मृत्यूच्या आधी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत या युद्धाबाबत बोलताना ट्रम्प यांच्यावर जोरदार टीका केली होती. अली मोहम्मद नैनी यांनी म्हटलं होतं की, "ट्रम्प म्हणाले नव्हते का की इराणचं नौदल नष्ट झालं आहे? तसं असेल तर त्यांनी आपलं धैर्य दाखवून आपली जहाजे पर्शियन आखातात पाठवावीत. युद्ध सुरू असूनही इराण क्षेपणास्त्र उत्पादन सुरू ठेवत आहे. तसेच आमच्याकडे क्षेपणास्त्राची कोणतीही कमतरता नाही", असं अली मोहम्मद नैनी यांनी म्हटलं होतं.

अली मोहम्मद नैनी यांनी अमेरिकेला इशारा देताना आणखी एक दावा केला होता. त्यांनी म्हटलं होतं की, अमेरिका आणि इस्रायलबरोबर इराण किमान आणखी सहा महिने तीव्रतेचं युद्ध लढू शकतो.

### सुरक्षा अधिकारी अली लारिजानी हल्ल्यात ठार

इराणचे सुरक्षा अधिकारी अली लारिजानी यांचा मृत्यू झाल्याची इराणकडून कबुली देण्यात आली आहे. इस्रायलने मंगळवारी रात्री केलेल्या हवाई हल्ल्यात दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मृत्यू झाल्याचा दावा केला होता. सुरुवातीला हा दावा फेटाळल्यानंतर आता इराणने लारिजानी यांच्यासह जनरल गुलाम रझा सोलेमनी यांचाही मृत्यू झाल्याच्या वृत्ताला इराणने दुजोरा दिला आहे. अयातुल्ला यांच्या मृत्यूनंतर हा दुसरा सर्वात मोठा झटका मानला जातो.


# “कॉल मी बे 2” मध्ये अनन्या पांडेचं पुनरागमन

अनन्या पांडे ही एक बॉलीवूड मधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. जिने अनेक वेब सिरीज चित्रपट केले आणि उत्तम अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात तिने घर निर्माण केली आहे. सध्या ती एका कारणामुळे पुन्हा चर्चेत आली आहे. ते म्हणजे तिची एक वेब सिरीज येत आहे. तर ही सिरीज म्हणजे कॉल मी बे’ या वेब सीरिजच्या दुसऱ्या सीझनमध्ये बेला ‘बे’ चौधरीच्या भूमिकेत अनन्या पांडे ही परतणार आहे. अभिनेत्री अनन्या पांडे गुरुवारी मुंबईत प्राईम व्हिडिओने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात करण्यात आली होती, या कार्यक्रमात, प्राईम व्हिडिओने या शोचा नवीन सीझन येत असल्याची आणि अनन्या पुन्हा एकदा मुख्य भूमिका साकारणार असल्याची पुष्टी केली. दुसऱ्या सीझनमध्ये, जेव्हा तिचा पूर्वाश्रमीचा पती परत येतो, तेव्हा बेचे आयुष्य अधिक गुंतागुंतीचे होते. तिला तिच्या आकर्षक बॉसविषयी आकर्षण वाटू लागते, ज्यामुळे ती द्विधा मनःस्थितीत सापडते, कारण तिला तिच्या भावना आणि वाढत्या करिअरमध्ये संतुलन साधण्यासाठी संघर्ष करावा लागतो. पहिल्या सीझनमधील अनन्या पांडे ,वीर दास, श्रुती हासन, गुरफतेह पीरजादा, वरुण सूद, विहान समत, मुस्कान जाफरी, निहारिका लायरा दत्त आणि लिसा मिश्रा या कलाकारांचा समावेश आहे. अभिनेत्री मिनी माथूर देखील नवीन सीझनमध्ये सामील होणार आहे. अनन्या पांडे अभिनीत कॉल मी बे याचा पहिल्या सीझन सप्टेंबर 2024 मध्ये प्रदर्शित झाला होता.





# ‘धुरंधर २’नंतर यामी गौतमचा नवा धमाका!



बॉलिवूड अभिनेत्री यामी गौतम सध्या चर्चेत आहे. एका बाजूला तिचा पती आदित्य धर दिग्दर्शित धुरंधर २ चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे, तर दुसऱ्या बाजूला यामी तिच्या नव्या चित्रपटामुळे चर्चेत आली आहे. ‘धुरंधर २’मध्ये यामी गौतमने छोटा पण प्रभावी कॅमिओ केला होता, ज्याचे प्रेक्षकांनी कौतुक केले. आता यामी गौतम लवकरच ‘नई नवेली’ या नव्या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. हा चित्रपट हॉरर आणि कॉमेडीचा अनोखा संगम असणार आहे. या चित्रपटाची घोषणा नुकतीच एका खास कार्यक्रमात करण्यात आली असून, त्यानंतर चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे. ‘नई नवेली’ हा चित्रपट प्रसिद्ध निर्माते आनंद एल राय यांच्या बॅनरखाली तयार होत आहे, तर दिग्दर्शनाची जबाबदारी बालाजी मोहन यांनी सांभाळली आहे. या चित्रपटात भारतीय पौराणिक कथांचा हलक्याफुलक्या कॉमेडी शैलीत समावेश करण्यात येणार आहे, जे प्रेक्षकांसाठी एक वेगळा अनुभव ठरेल. या चित्रपटाची कथा दिव्य निधी शर्मा यांनी लिहिली आहे. त्यांनी यापूर्वीही अनेक लोकप्रिय प्रकल्पांवर काम केले आहे. सध्या ‘नई नवेली’चे प्री-प्रोडक्शन सुरू असून, लवकरच चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात होणार आहे. रिलीजबाबत बोलायचे झाले तर, या चित्रपटाची थिएटर रिलीज डेट अजून जाहीर झालेली नाही. मात्र, चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर तो ॲमेझॉन प्राइम व्हिडिओ या OTT प्लॅटफॉर्मवर पाहायला मिळणार आहे. यामी गौतमचा यापूर्वीचा ‘हक’ हा चित्रपट थिएटरमध्ये फारसा चालला नव्हता, पण OTT वर त्याला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळे ‘नई नवेली’कडूनही मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. एकूणच, यामी गौतम आता पुन्हा एकदा वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांसमोर येणार असून, हॉरर-कॉमेडी या प्रकारात ती काय कमाल करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मुंबईत अभिनेत्री निमिषा नायरसोबत रस्त्यावर छेडछाड

मुंबईसारख्या सुरक्षित मानल्या जाणाऱ्या शहरात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. निमिषा नायर या अभिनेत्रीने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत सांगितले की, त्यांच्या सोबत रस्त्यावर छेडछाड आणि धमकावण्याची घटना घडली. या घटनेमुळे शहरातील महिलांच्या सुरक्षेबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत. ही घटना मंगळवारी पहाटे सुमारे ४:५० वाजता घडली. निमिषा नायर या बांद्रा पूर्व येथील खेरवाडी फ्लायओव्हरवरून कॅबने प्रवास करत होत्या. त्याचवेळी दोन युवक त्यांच्या गाडीसमोर आले आणि त्यांनी रस्ता अडवण्याचा प्रयत्न केला. हे दोघेही नशेत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. सुरुवातीला हा वाद ओव्हरटेक करण्याच्या कारणावरून झाला. मात्र, काही वेळातच परिस्थिती गंभीर झाली. त्या युवकांनी आपली स्कूटी रस्त्याच्या मधोमध उभी केली आणि कॅब ड्रायव्हरला शिवीगाळ करू लागले. त्यांनी गाडीचे दरवाजे उघडण्याचा प्रयत्न केला आणि खिडकी उघडण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला. मात्र, भीतीमुळे निमिषा आणि ड्रायव्हर यांनी खिडकी उघडली नाही. निमिषा नायर यांनी सांगितले की, यापूर्वीही याच वर्षी कोलाबा परिसरात त्यांच्यासोबत अशाच प्रकारची घटना घडली होती. त्या वेळी त्यांनी पोलिसांत तक्रारही दाखल केली होती. या नव्या घटनेनंतरही त्यांनी तक्रार करण्याचा प्रयत्न केला, मात्र व्यस्त वेळापत्रक आणि ऑनलाइन तक्रार प्रक्रियेत काही तांत्रिक अडचणी आल्या. या घटनेनंतर निमिषा यांनी इंस्टाग्रामवर अपडेट देत सांगितले की, त्यांना मुंबई पोलीस यांच्याकडून संपर्क साधण्यात आला. कंट्रोल रूम आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडून संपूर्ण माहिती घेतली. त्यांनी घटनेचे सर्व पुरावे पोलिसांना दिले असून तपास सुरू असल्याचे सांगितले आहे. पोलिसांनी कॅब ड्रायव्हरने स्वतः तक्रार नोंदवावी, अशी मागणी केली आहे. मात्र, निमिषा यांनी पोलिसांना विनंती केली की, त्यांच्या कडे असलेल्या पुराव्यांच्या आधारे संबंधित युवकांवर कारवाई करावी.



# चेन्नईला आणखी एक मोठा धक्का!

## नॅथन एलिसनंतर संघातील आणखी एक खेळाडू दुखापतग्रस्त

महाईन्यूज । नवी दिल्ली

**जगातील सर्वात मोठी क्रिकेट लीग स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आयपीएल २०२६ स्पर्धेला येत्या २८ मार्चपासून सुरूवात होणार आहे. स्पर्धेतील पहिली लढत सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या दोन्ही संघांमध्ये पार पडणार आहे. तर ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली खेळणारा चेन्नई सुपर किंग्ज संघ पहिल्या सामन्यात राजस्थान रॉयल्स संघाचा सामना करणार आहे. या सामन्याआधी चेन्नईला दुसरा मोठा धक्का बसला आहे. नॅथन एलिस स्पर्धेबाहेर झाल्यानंतर, आणखी एक स्टार खेळाडू दुखापतग्रस्त झाला आहे. त्यामुळे चेन्नई सुपर किंग्ज संघाची चिंता वाढली आहे.**



चेन्नई सुपर किंग्ज संघाचा पहिला सामना ३० मार्चला राजस्थान रॉयल्स संघाविरूद्ध होणार आहे. चेन्नई सुपर किंग्ज संघाने आगामी हंगामासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. १९ मार्चला चेन्नई सुपर किंग्ज संघाला पहिला मोठा धक्का बसला. संघातील प्रमुख वेगवान गोलंदाज नॅथन एलिस दुखापतीमुळे संपूर्ण स्पर्धेतून बाहेर झाला आहे. त्यामुळे चेन्नईचा संघ त्याच्या रिप्लेसमेंटच्या शोधात आहे. पण असं असताना, चेन्नईला आणकी एक मोठा धक्का बसला आहे. क्रिकबझने दिलेल्या वृत्तानुसार, मॅथ्यू शॉर्ट दुखापतग्रस्त आहे. त्यामुळे तो सुरूवातीच्या काही सामन्यांमधून बाहेर होऊ शकतो. जर मॅथ्यू शॉर्ट स्पर्धेतून बाहेर पडला, तर हा चेन्नई सुपर किंग्ज संघासाठी सर्वात मोठा धक्का असेल.

स्पर्धा सुरू होण्याआधीच चेन्नई सुपर किंग्ज संघाला एकापाठोपाठ एक मोठे धक्के बसले आहेत. नॅथन एलिस संघातील प्रमुख वेगवान गोलंदाजांपैकी एक होता. त्याची जागा भरून काढणं सीएसकेला जड जाऊ शकतं. मॅथ्यू शॉर्टचा बोट फ्रॅक्चर असल्यामुळे तो सुरूवातीचे काही सामने खेळू शकणार नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे अकील हुसेनला अष्टपैलू खेळाडू म्हणून संधी दिली जाऊ शकते.

यावेळी चेन्नई सुपर किंग्ज संघात काही नवे चेहरे पाहायला मिळू शकतात. गेल्या हंगामात राजस्थान रॉयल्स संघाचं प्रतिनिधित्व केलेला संजू सॅमसन आगामी हंगामात चेन्नई सुपर किंग्ज संघाकडून खेळताना दिसणार आहे. त्याला डावाची सुरूवात करण्याची संधी दिली जाऊ शकते. तर मुंबईचा युवा फलंदाज आयुष म्हात्रे देखील चेन्नई सुपर किंग्ज संघाचा भाग आहे. त्यामुळे ही जोडी चेन्नईसाठी डावाची सुरूवात करताना दिसू शकते.

# इराणमध्ये १९ वर्षीय कुस्तीपटूला फाशी; क्रीडा विश्वात खळबळ!

महाईन्यूज । नवी दिल्ली

**इराणमधील खेळाडूंवर सुरू असलेल्या दमनकारी कारवाईने संपूर्ण क्रीडा जगत हादरले आहे. आंतरराष्ट्रीय पदक विजेता १९ वर्षीय कुस्तीपटू सालेह मोहम्मदी याला इराण सरकारने फाशी दिल्याने जागतिक स्तरावर संताप व्यक्त होत आहे. या घटनेमुळे आता इराणच्या तुरुंगात असलेल्या इतर खेळाडूंच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे.**





सालेह मोहम्मदी याच्यावर दोन पोलीस अधिकाऱ्यांच्या हत्येचा आरोप होता. मात्र, मोहम्मदीने सुरुवातीपासूनच हे आरोप फेटाळून लावले होते. "माझा कबुलीजबाब छळ करून आणि अतोनात यातना देऊन घेण्यात आला आहे," असा दावा त्याने न्यायालयात केला होता. विशेष म्हणजे, या प्रकरणातील सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींच्या साक्षींकडेही प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप मानवाधिकार संघटनांनी केला आहे. ही घटना २०१८ मधील नवीद अफकारी या कुस्तीपटूच्या फाशीच्या प्रकरणाची पुनरावृत्ती मानली जात आहे.

इराणच्या तुरुंगात सध्या केवळ कुस्तीपटूच नव्हे, तर विविध खेळांतील नामांकित खेळाडू, प्रशिक्षक आणि पंच बंदिस्त आहेत. यात प्रामुख्याने फुटबॉल: मोहम्मद हुसेन हुसेनी आणि आमीर रझा नस्र आझादानी, बॉक्सिंग: आशियाई युवा कांस्यपदक विजेता मोहम्मद महशारी आणि मोहम्मद जवाद वफाए सानी. इतर: मॅरेथॉन धावपटू निलोफर पास, बास्केटबॉल प्रशिक्षक पयाम वाहिदी आणि वॉटर पोलो गोलकीपर अली पिशेवरजादेह, यांचा समावेश आहे.

### आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीकडे धाव

इराणमधील या अत्याचाराविरोधात देशांतर्गत आणि जागतिक स्तरावरील सुमारे २०० हून अधिक खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीला पत्र लिहिले आहे. इराणमधील क्रीडा संघटना या तिथल्या सुरक्षा यंत्रणांच्या हातातील बाहुली बनल्या असून त्या खेळाडूंच्या मानवाधिकारांचे उल्लंघन करत आहेत, असा ठपका या पत्रात ठेवण्यात आला आहे. सालेह मोहम्मदीच्या फाशीनंतर, आता इतर खेळाडूंचीही सुनावणी न घेता त्यांना अशीच शिक्षा दिली जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज™
ePaper
। शनिवार ।
दि. 21 मार्च 2026।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## ‘ट्रायोज-झूलेलाल टॉवर’ रस्त्याचे काम अखेर सुरू | शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या पाठपुराव्याला यश

# पिंपळे सौदागरच्या विकासातील मोठा अडथळा दूर!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपळे सौदागर येथे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या आणि नागरिकांसाठी अत्यंत महत्वाचा १८ मीटर रुंद ‘ट्रायोज-झूलेलाल टॉवर’ रस्ता अखेर कॉंक्रीटीकरणासाठी मार्ग मोकळा झाला आहे. भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे, नगरसेविका अनिता काटे आणि नगरसेविका कुंदा भिसे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आणि प्रशासनाशी केलेल्या सातत्यपूर्ण संवादामुळे हे काम प्रत्यक्ष सुरू करण्यात आले आहे.**

> "पिंपळे सौदागरच्या रहिवाशांसाठी हा रस्ता फक्त कॉंक्रीटचा रस्ता नाही, तर दळणवळणाची जीवनरेषा आहे. आम्ही दर्जेदार आणि वेगवान काम करून लवकरच नागरिकांच्या सेवेत हा रस्ता आणू, जेणेकरून नागरिकांना वाहतूक कोंडी आणि धुळीचा त्रास भोगावा लागणार नाही.
> **- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.**



विशेष म्हणजे, हा रस्ता पिंपळे सौदागरच्या मध्यवर्ती भागातून जात असून अनेक गृहप्रकल्पांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. मात्र, जमिनीचे अधिग्रहण, तांत्रिक अडचणी आणि प्रशासनिक कारणांमुळे गेल्या अनेक वर्षांपासून कॉंक्रिटीकरण प्रलंबित होते. रस्ता अर्धवट असल्याने नागरिकांना धुळीचा त्रास, वाहतूक कोंडी आणि गैरसोय भोगावी लागत होती.

दरम्यान, रस्त्याचे काम सुरू झाल्याने स्थानिक सोसायट्यांचे पदाधिकारी, रहिवासी आणि नागरिक आनंद व्यक्त करत आहेत. भाजप लोकप्रतिनिधींनी दाखवलेली ही ‘राजकीय इच्छाशक्ती’ पिंपळे सौदागरला अधिक स्मार्ट बनवण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. या कार्यक्रमाला उद्योजक संदिप काटे, संजय भिसे, धनंजय भिसे तसेच परिसरातील इतर प्रतिष्ठित नागरिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे म्हणाले की, आम्ही महापालिका प्रशासनासोबत नियमित बैठका घेतल्या आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सतत पाठपुरावा करून सर्व अडथळे दूर केले. निवडणूक दरम्यान ट्रायोज आणि झूलेलाल टॉवर्स सोसायटी रहिवासी आणि सौदागरच्या नागरिकांना दिलेला शब्द पूर्ण होताना पाहून मोठे समाधान वाटत आहे. हा रस्ता केवळ सिमेंट-कॉंक्रीटचा रस्ता नाही, तर हा भागातील दळणवळणाची ‘लाईफलाईन’ आहे. तांत्रिक अडचणींमुळे काम ठप्प झाले होते, परंतु प्रशासनाशी सातत्यपूर्ण संवादातून आज हे काम मार्गी लावले आहे. दर्जेदार आणि जलद गतीने पूर्ण करून लवकरच नागरिकांच्या सेवेत हा रस्ता येईल, असेही शत्रुघ्न काटे यावेळी म्हणाले.

---

## अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट; पत्राशेडचे शहरभर पेव

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वच भागांत धोकादायकरीत्या अनधिकृत बांधकामे उभी राहत आहेत. तेथील सदनिका सर्वसामान्य नागरिकांना माथी मारल्या जात आहेत. महापालिकेने आरक्षण टाकलेल्या जागेतही अनधिकृत बांधकामे बिनदिक्कत सुरू आहेत. त्यामुळे अनधिकृत बांधकामांचे पेव जोरात फुटले आहे. निवडणूक संपून, नवीन कारभारी आल्यानंतरही कारवाई मोहीम थंड असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.**

नऊ वर्षांनंतर झालेल्या महापालिका निवडणुकीत अनधिकृत बांधकामांचा मुद्दा गाजला. निवडणुकीसाठी महापालिकेची सर्व यंत्रणा कामाला लागल्याने कारवाई बंद झाल्यामुळे शहरातील सर्वच भागांत अनधिकृत बांधकामांची संख्या जोरात वाढली आहे. नोव्हेंबर 2025 पासून सांगवी, नवी सांगवी, पिंपळे गुरव, दापोडी, कासारवाडी, फुगेवाडी, थेरगाव, रहाटणी, काळेवाडी, चिंचवड, चिंचवड स्टेशन, आकुर्डी, निगडी, चिखली, तळवडे,



भोसरी, दिघी, पुनावळे आदी भागांत अनधिकृत बांधकामांचे अक्षरशः पेव फुटले आहे. तसेच, रातोरात पत्राशेड उभारून हॉटेल, फर्निचर, भंगार विक्री आदी व्यावसायिक हेतूने वापर केला जात आहे.

आरक्षित जागा, सर्वजनिक जागा, नैसर्गिक नाले, गटारे, पदपथ आदी ठिकाणी अतिक्रमण करूनही अनधिकृत बांधकामे बिनदिक्कतपणे उभारले जात आहेत. तीन ते चार महिन्यांत तीन ते चार मजली अनधिकृत इमारती रंग देऊन तयार होतात. सदनिका व गाळे लगोलग सर्वसामान्य नागरिकांना विकल्याही जातात. दर कमी असल्याने अनधिकृत इमारतीतील घरे तात्काळ विकलीही जातात. अनधिकृत बांधकामे उभी करण्याचे प्रकार सर्रासपणे सुरू आहेत. तसेच, समोरील, आजूबाजूची जागा तसेच, पार्किंगची जागा बळकावून हॉटेल, दुकान व इतर आस्थापना थाटल्या जात आहेत. त्या अनधिकृत बांधकामांकडे क्षेत्रीय कार्यालयाच्या अतिक्रमण विरोधी पथकाकडून तसेच, बीट निरीक्षक आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष केले जात आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींकडून त्या प्रकाराला प्रोत्साहन दिले जात असून, विरोधकांच्या तक्रारींना प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याचे चित्र आहे.

# कृष्णानगर येथे ५१ फूट उंच भगव्या ध्वजाचे राष्ट्रार्पण

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची उपस्थिती; देव-देश-धर्मासाठी जागृत राहण्याचा संकल्प

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपलिका प्रभाग क्रमांक ११ मधील कृष्णानगरमध्ये हिंदु नववर्षारंभ अर्थात गुढी पाडवाच्या निमित्ताने देशभक्ती, हिंदुत्व आणि अभिमान यांचा अद्वितीय संगम पाहायला मिळाला. या वेळी भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते ५१ फुटी भव्य भगव्या ध्वजाचे राष्ट्रार्पण करण्यात आले, ज्यामुळे परिसरातील नागरिकांच्या मनात नवीन उत्साह निर्माण झाला.**





"देशभक्ती ही फक्त गाणी, ध्वज किंवा उत्सवापुरती मर्यादित नाही. ती आपल्या रोजच्या कर्मात, आपल्या प्रत्येक कृतीत आणि समाजाच्या विकासात प्रकटली पाहिजे. जेथे श्रद्धा आणि समर्पण असते, तिथे राष्ट्रभक्तीची खरी उंची गाठता येते. आपल्याला आपली संस्कृती जपायची आहे, आपले मूल्य जपायचे आहेत आणि प्रत्येक छोटा उपक्रम समाजात मोठा बदल घडवू शकतो. भगवा ध्वज हे फक्त कापड नाही, तर त्यामध्ये आपली एकता, आपली ओळख आणि आपल्या भविष्याची दिशा दडलेली आहे. नागरिकांनी हा संदेश आत्मसात केला तरच आपण वास्तवात राष्ट्रभक्तीचा आदर्श निर्माण करू शकतो.

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

ध्वजारोहण सोहळा कामगार नेते सचिन लांडगे यांच्या शुभहस्ते पार पडला. आकाशात झेपावलेला भगवा ध्वज पाहून उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करत अभिमान व्यक्त केला. या भव्य उपक्रमाची संकल्पना जगदंब प्रतिष्ठान, कृष्णानगर यांनी केली असून, स्थानिक नगरसेविका रिटा सचिन सानप आणि सामाजिक कार्यकर्ते सचिनसानप यांच्या पुढाकारातून हा सोहळा साकार झाला.

सोहळ्यात आमदार महेश लांडगे, कामगार नेते सचिन लांडगे, नगरसेवक निलेश नेवाळे, कुंदन गायकवाड, योगिता नागरगोजे, पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे आणि अनेक समाजसेवी तसेच नागरिक उपस्थित होते.

नगरसेविका रिटा सानप म्हणाल्या की, "या भव्य ध्वजारोहणामुळे कृष्णानगर परिसरात हिंदुत्व आणि राष्ट्रभक्तीचा संदेश अधिक बळकट झाला आहे आणि नागरिकांमध्ये नवीन ऊर्जा संचारली आहे."




# कडक उन्हामुळे आरोग्य धोक्यात; नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात उन्हाचा तडाका वाढला आहे. त्यामुळे उष्माघाताचा त्रास होऊ शकतो. नागरिकांनी दुपारच्या वेळेच्या तीव्र उन्हात घराबाहेर पडू नये. गरज असल्यास टोपी, छत्री व गॉगलचा वापर करावा. सतत पाणी प्यावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.**




उन्हाळ्यात आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. घराबाहेर पडताना गॉगल, छत्री अथवा टोपीचा वापर करा. सूर्यप्रकाशापासून वाचण्यासाठी घरातील पडदे आणि झडपांचा वापर करा. उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडिओ, टीव्ही किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करण्यात यावा. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. उन्हात काम करीत असल्यास टोपी, छत्री किंवा ओल्या कपड्याने डोके, मान, चेहरा झाकण्यात यावा.

गुरांना छावणीत ठेवण्यात यावे. त्यांना पुरेसे पाणी पिण्यास देण्यात यावे. शक्य त्या ठिकाणी पक्षी व प्राण्यांना योग्य त्या ठिकाणी पिण्याच्या पाणी ठेवण्यात यावे. नागरिकांसाठी पानपोईची व्यवस्था करावी. घर थंड ठेवण्यासाठी पडदे शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा.

तसेच, रात्री खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात. पंखे, ओले कपडे याचा वापर करण्यात यावा. थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. सूर्यप्रकाशाचा संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचित करण्यात यावे. पहाटेच्यावेळी जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. बाहेर कामकाज करीत असल्यास मध्ये मध्ये विश्रांती घेऊन नियमित आराम करण्यात यावा. गरोदर स्त्रिया आणि आजारी कामगारांची अधिक काळजी घेण्यात यावी.

### चक्कर आली? डॉक्टरांचा सल्ला घ्या!

अशक्तपणा, डोकेदुखी सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास, तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास जठड, घरी बनवण्यात आलेली लस्सी, कैरीचे पन्हे, लिंबू-पाणी, ताक इत्यादीचा वापर नियमित करावा. पुरेसे पाणी प्या, तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी प्या.

### उन्हात दारू, चहा, कॉफीचे सेवन टाळा

- तीव्र उन्हात अतिकष्टाची कामे करू नका. दारू, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड थंड पेये घेऊ नका. दुपारी 12 ते 3 च्या दरम्यान घराबाहेर जाणे टाळा. उच्च प्रथिनेयुक्त तसेच, शिळे अन्न खाऊ नका. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये.
- गडद घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान जास्त असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावी. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे. तसेच, मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी, असा सूचना प्रशासनाने केल्या आहेत.



# AQI सुधारण्यासाठी महापौरांचा ‘ॲक्शन मोड’

## प्रदूषण नियंत्रणासाठी प्रशासन-नागरिक समन्वय; नियमित आढावा बैठकींचे आदेश

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

**पिंपरी चिंचवड शहरातील वाढत्या वायू प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर व वायू गुणवत्ता निर्देशांक (AQI) सुधारण्यासाठी मा. महापौर रवि लांडगे यांनी ठोस भूमिका घेत शहरासाठी व्यापक उपाययोजनांचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. पर्यावरण विषयक संस्था, तज्ज्ञ व विविध घटकांसोबत झालेल्या बैठकीत प्राप्त सूचना व सुचविलेले पर्याय यांच्या आधारे महापौरांनी मा. आयुक्त यांना निवेदनाद्वारे तातडीच्या व कडक कार्यवाहीचे निर्देश दिले.**



### कडक कारवाई करण्याचा इशारा

“वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन दोन्ही पातळ्यांवर काम करणे गरजेचे आहे. आवश्यक तेथे कडक कारवाई करण्यास मागेपुढे पाहिले जाणार नाही. नागरिकांचे आरोग्य सर्वोच्च प्राधान्य आहे,” असेही महापौरांनी यावेळी नमूद केले. महापौरांनी सर्व संबंधित विभागांची जबाबदारी निश्चित करून नियमित आढावा बैठकीद्वारे प्रगती तपासण्याचे आदेश दिले आहेत. तसेच राबविण्यात येणाऱ्या सर्व उपाययोजनांचा सविस्तर अहवाल (ACTION TAKEN REPORT) निश्चित कालावधीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शहरातील पर्यावरण संवर्धन, नागरिकांचे आरोग्य आणि शाश्वत विकास लक्षात घेऊन या सर्व उपाययोजनांची तातडीने व प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, असे स्पष्ट आदेश महापौरांनी प्रशासनाला दिले आहेत.

शहरातील वाढते औद्योगिकीकरण, वाहनांची वाढती संख्या, बांधकामांमुळे निर्माण होणारी धूळ तसेच कचरा जाळण्याच्या घटनांमुळे AQI चिंताजनक पातळीवर जात असल्याची गंभीर दखल घेत महापौरांनी प्रशासनाला जबाबदाऱ्या निश्चित करून परिणामकारक अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत.

महापौरांच्या निर्देशानुसार शहरात वायू गुणवत्ता मापन केंद्रांची संख्या वाढविणे, रिअल-टाईम AQI माहिती नागरिकांसाठी उपलब्ध करणे, संवेदनशील भागांमध्ये विशेष मॉनिटरिंग व्यवस्था उभारणे यास प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम प्रभावी करणे, सार्वजनिक परिवहनाचा वापर वाढविणे, ई-वाहनांना प्रोत्साहन देणे व प्रदूषण करणाऱ्या जुन्या वाहनांवर कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रणासाठी नियमित तपासणी, प्रदूषण नियंत्रण यंत्रणांची सक्ती व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बांधकाम प्रकल्पांवर ग्रीन नेट व डस्ट बॅरियर अनिवार्य करणे, रस्त्यांची नियमित स्वच्छता व पाण्याची फवारणी सुनिश्चित करणे तसेच कचरा जाळण्यावर पूर्ण बंदी घालून कडक कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश महापौरांनी दिले आहेत.

याशिवाय शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण, हरित पट्टे, शहरी वन व ऑक्सिजन पार्क विकसित करण्यावर भर देत दीर्घकालीन पर्यावरणीय संतुलन साधण्याचा महापौरांचा निर्धार व्यक्त करण्यात आला. AQI गंभीर पातळीवर गेल्यास “GRAP (GRADED RESPONSE ACTION PLAN)” तातडीने लागू करण्याचे ही निर्देश देण्यात आले आहेत.

“पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छ व सुरक्षित हवा मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. AQI सुधारणा ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून संपूर्ण शहराची सामूहिक जबाबदारी आहे. मात्र, या विषयात कोणतीही ढिलाई सहन केली जाणार नाही. सर्व विभागांनी समन्वय साधून ठोस आणि परिणामकारक कार्यवाही करावी, तसेच नागरिकांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा,” असा स्पष्ट व ठाम संदेश महापौर रवि लांडगे यांनी दिला.

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो अंतिम टप्प्यात; मेपर्यंत १२ स्थानके सुरू होणार

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**पुणेकरांसाठी आणि विशेषतः हिंजवडी आयटी पार्कमधील कर्मचाऱ्यांसाठी दिलासादायक ठरणारी माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो (लाइन ३) आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) प्रशासनाने या मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यातील १२ स्थानके मे २०२६ पर्यंत सुरू करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.**




### मेपर्यंत पहिला टप्पा सुरू...

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाचे सुमारे ९४.२० टक्के काम पूर्ण झाले असून पहिल्या टप्प्यातील १२ स्थानके मे २०२६ पर्यंत सुरू करण्याचे नियोजन आहे. सिग्नलिंग चाचण्या अंतिम टप्प्यात असून लवकरच प्रवाशांसाठी सेवा उपलब्ध होणार आहे.

पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी गुरुवारी (दि. १९) प्रत्यक्ष ‘ग्राउंड’ पाहणी करत प्रकल्पाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला.

औंध येथील बैठकीनंतर आयुक्तांनी माण ते शिवाजीनगर या २३.२ किलोमीटर लांबीच्या संपूर्ण मार्गिकेवरील २३ स्थानकांची पाहणी केली. यावेळी मुख्य अभियंता रिनाज पठाण आणि ‘पीआयटीसीएमआरएल’चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिलकुमार सैनी उपस्थित होते. कामाचा वेग वाढवताना गुणवत्ता आणि सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड होऊ नये, अशा स्पष्ट सूचना आयुक्तांनी कंत्राटदारांना दिल्या. कागदोपत्री अहवालांवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष कामाचा दर्जा, तांत्रिक अडचणी आणि स्थानकांची सद्यःस्थिती त्यांनी तपासली. सध्या या प्रकल्पाचे सुमारे ९४.२० टक्के काम पूर्ण झाले असून, सिग्नलिंगच्या तांत्रिक चाचण्या सुरू आहेत. आरडीएसओ आणि सीएमआरएस तपासणीची प्रक्रिया देखील पूर्ण झाली आहे. हिंजवडी परिसरातील वाढती वाहतूककोंडी लक्षात घेता, ही मेट्रो सेवा सुरू झाल्यानंतर आयटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. शिवाजीनगर ते हिंजवडी हा प्रवास काही मिनिटांत पूर्ण होण्याची शक्यता असून, खासगी वाहनांवरील ताणही काही प्रमाणात कमी होणार आहे.

# एमआयटी महाविद्यालयात 'AI and Innovation Sprints' हॅकेथॉन उत्साहात

## विद्यार्थ्यांकडून AI आधारित अभिनव प्रकल्प...



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या INSTITUTION'S INNOVATION COUNCIL (IIC) च्या वतीने "AI AND INNOVATION SPRINTS: DIGITAL TRANSFORMATION" या विषयावर हॅकेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला राज्यभरातील १७ विविध महाविद्यालयांमधून एकूण ७८ संघांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदवला.**

कार्यक्रमास महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे, उपसंचालक डॉ. अक्षदा कुलकर्णी, IIC चे उपाध्यक्ष प्रा. अभिजीत नेटके तसेच IIC संयोजक डॉ. संदीप ढवळे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. कविता महाजन यांनी यशस्वीरीत्या जबाबदारी पार पाडली. हॅकेथॉनमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा प्रभावी वापर करून विविध नाविन्यपूर्ण प्रोटोटाइप सादर केले. स्पर्धेचे मूल्यांकन संतोष जगताप व अरुण आयनोडकर यांनी केले.

या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संघांना रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. भावेश परिहार यांनी प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक दिग्विजय जाधव, तेजस जाधव व आदित्य जाधव यांनी मिळवला, तर तृतीय क्रमांक दिपक यादव व पवन राउत यांनी मिळवला. अशा प्रकारच्या हॅकेथॉन स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना चालना मिळून त्यांच्यातील संशोधन व तांत्रिक कौशल्यांना प्रोत्साहन मिळते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

> "आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता ही केवळ तंत्रज्ञान नसून भविष्यातील विकासाची किल्ली आहे. अशा हॅकेथॉनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांना प्रत्यक्षात उतरवण्याची संधी मिळते. एमआयटी महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या नवोपक्रमशील विचारांना नेहमीच प्रोत्साहन देत राहील.
>
> - डॉ. बी. बी. वाफारे, संचालक.



# तीन महिन्यांत १३ जणांचा बुडून मृत्यू!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मावळ तालुक्यात यंदा जानेवारी ते मार्चदरम्यान तब्बल १३ जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. पर्यटकांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यूची मालिका सुरू असून, गेल्या दोन वर्षांत २६ व्यक्तींनी अशा दुर्घटनांमध्ये जीव गमावला आहे. त्यामुळे पर्यटन स्थळांवरील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**

उन्हाळ्याची चाहूल लागताच मावळातील धरणे, नद्या आणि धबधब्यांकडे पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. विशेषतः पुणे-मुंबई परिसरातून शनिवार-रविवारी मोठ्या संख्येने पर्यटक येत आहेत. पण, पाण्यात उतरण्याच्या मोहामुळे याच ठिकाणी बुडून मृत्यू होणाऱ्यांच्या संख्येतही वाढ होत आहे. काही प्रसंगांत वन्यजीव रक्षक संस्था आणि शिवदुर्ग लोणावळा या दोन संस्थांतील सदस्यांनी आतापर्यंत अनेकांचे प्राण वाचवले आहेत.

स्थानिक नागरिकांच्या मते, 'अनेक पर्यटक कोणतीही खबरदारी न घेता थेट पाण्यात उतरतात. काही जण 'सेल्फी' किंवा व्हिडिओ घेण्याच्या नादात धोकादायक ठिकाणी जातात. त्यातच मद्यप्राशन करून पाण्यात उतरणे, इशारे दुर्लक्षित करणे आणि पोहण्याचे कौशल्य नसतानाही खोल पाण्यात जाणे ही अपघातांची प्रमुख कारणे ठरत आहेत.'

# पिंपरी चिंचवड महापालिकेकडून वेस्ट टू वंडर स्पर्धा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**जागतिक पुनर्वापर दिनाचे औचित्य साधून पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने क्षेत्रीय कार्यालयांसाठी 'वेस्ट टू वंडर' या अभिनव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल व सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या अधिपत्याखाली आरोग्य विभागामार्फत ही स्पर्धा राबविण्यात येत आहे.**

> वेस्ट टू वंडर स्पर्धेमुळे नागरिकांमध्ये स्वच्छतेबरोबरच सर्जनशीलतेची जाणीव निर्माण होईल. टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून शहर अधिक सुंदर आणि वसुंधरापूरक बनविण्यासाठी हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरेल.
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका



> वेस्ट टू वंडर हा उपक्रम केवळ स्वच्छतेपुरता मर्यादित नसून, नागरिकांमध्ये वसुंधरापूरक सवयी रुजविण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर याबाबत जनजागृती वाढवून शहर अधिक स्वच्छ व शाश्वत करण्यासाठी ही स्पर्धा उपयुक्त ठरेल.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ३२ प्रभागांमध्ये ही स्पर्धा आयोजित करण्यात आली असून, शहर स्वच्छतेवर भर देतानाच वस्तूंचा सुयोग्य पुनर्वापर करून कलात्मकता जोपासण्याचा दुहेरी उद्देश या उपक्रमामागे आहे. टाकाऊ वस्तूंना नवसंजीवनी देत स्वच्छतेसोबत सौंदर्याची अनोखी सांगड घालण्याचा प्रयत्न यामधून करण्यात येत आहे.

या स्पर्धेमुळे संपूर्ण शहरात स्वच्छते बरोबर कलेचा आकर्षक व सर्जनशील आविष्कार पाहायला मिळणार आहे. प्रत्येक प्रभागातून टाकाऊ वस्तूंचे रूपांतर कल्पक कलाकृतींमध्ये करून पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश दिला जाणार आहे.

स्पर्धे अंतर्गत कचरा संवेदनशील ठिकाणांचे नाविन्यपूर्ण व आकर्षक रूपांतर करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. त्यामुळे शहरात सौंदर्यीकरण होऊन नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता वाढण्यास मदत होणार आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खालील लिंकवर नोंदणी करणे आवश्यक असून, नोंदणीची अंतिम मुदत २४ मार्च २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत आहे.

लिंक : HTTPS://FORMS.GLE/LSXTPH6AXEAAK4LW7

वेस्ट टू वंडर हा विभागाचा हा उपक्रम शहराच्या सौंदर्यात भर घालणारा आणि वसुंधरापूरक जीवनशैलीस चालना देणारा ठरेल, असा विश्वास सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांनी व्यक्त केला.

